साईबाबा जनता सहकारी बँक लि. लातूर.

# अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

## (फक्त सभासदा करिता)

आपल्या बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते कि, बँकेच्या अधीमंडळाची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता भालचंद्र ब्लड बँक, गांधी मार्केट लातूर येथील सभागृहात खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी बँकेचे चेअरमन मा.श्री. अ.जब्बारजी सगरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येणार आहे . तरी बँकेच्या सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे हि विनंती.

**सभेपुढील विषय :**

१. मागील वार्षिक सर्व साधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि. ३१ मार्च २०२६ अखेर संपलेल्या आर्थीक वर्षाचा अहवाल, ताळेबंद पत्रक, नफा तोटा पत्रकास मंजूरी देणे.
३. सन २०२५-२०२६ या आर्थीक वर्षात अंदाज पत्रकापेक्षा कमी / अधिक झालेल्या खर्चास व सन २०२६-२०२७ या वर्षाचे अंदाज पत्रकास मंजूरी देणे.
४. सन २०२५-२०२६ च्या वैधानीक लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेणे.
५. सन २०२५-२०२६ च्या वैधानीक लेखापरीक्षणाच्या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
६. सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी संचालक मंडळाने शिफारस केलेल्या वैधानीक लेखापरीक्षकांच्या नियुक्तिस भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मंजूरीस आधीन राहून मान्यता देणे.
७. एकरकमी कर्जपरतफेड योजने अंतर्गत दिलेल्या सुटीस मंजूरी देणे.
८. बँकेस चार चाकी वाहन खरेदी करण्यास मंजूरी देणे.
९. मा. अध्यक्षांच्या पुर्वपरवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून
**श्री. आर.एम. पाटील**
मुख्य कार्यकारी अधिकारी

स्थळ : लातूर
दिनांक : ०२/०९/२०२६

**सुचना :**

१. गणपुर्ती (कोरम) अभावी सभा तहकुब झाल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी त्याच विषयावर चर्चा करण्यासाठी अर्धा तासानंतर भरेल, त्या सभेस गणपुर्ती (कोरम) ची आवश्यकता राहणार नाही.
२. सभासदास काही प्रश्न विचारावयाचे असल्यास कृपया सभेच्या तारखेपूर्वी सात दिवस अगोदर बँकेच्या मुख्य कार्यालयात लेखी सादर करावेत.
३. सन्माननीय सभासदाना विनंती करण्यात येते की ज्यांचे भाग अपूर्ण आहेत त्यांनी रु. १००० च्या पटीत करुन घ्यावे. व आपले मो.नं., ईमेल आयडी, व केवायसी कागदपत्रे बँकेत द्यावेत.